**महाराष्ट्र शासन**

# उपविभागीय अधिकारी, गडचिरोली यांचे कार्यालय

**बस स्टॅंड समोर, धानोरा रोड गडचिरोली पीन- 442 605**

दुरध्वनी क्र. 07132- 233015 Email ID : sdogad.gadchiroli@gamil.com

क्रमांक : उविअ/शिरस्तेदार/कावि/ 607/2020 दिनांक : 16 मार्च, 2020

## आदेश

(फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ नुसार)

ज्याअर्थि, या उपविभागातील गडचिरोली व धानोरा तालुक्यात अस्तीत्वात असलेल्या सर्व रेती घाटांवरुन मोठया प्रमाणात वाळु/रेतीची अवैधपणे उत्खनन करुन वाहतुक होत असल्याबाबतची प्रकरणे या कार्यालयाचे निदर्शनास आलेली आहेत. अशा प्रकारावर वेळीच आळा घालणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, गौण खनिजाच्या अवैध उत्खननामुळे भौगोलीक पस्थितीवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही, जसे की, जमिनीची धुप होणे, सार्वजनिक रस्ते खराब होणे तसेच पर्यावरणानाचा ऱ्हांस होऊन नैसर्गीक संतुलन बिघडणे तसेच शासनाच्या महसुलाचा मोठयाप्रमाणात नुकसान होवुन मानवी जिवनावर व निसर्गावर याचा विपरीत परिणाम होऊन नैसर्गीक आपत्ती उदभवण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्याअर्थी, या उपविभागातील गडचिरोली व धानोरा तालुक्यात अस्तीत्वात असलेल्या सर्व रेती घाटांवर व घाटापासून १०० मिटरचे परिघीय क्षेत्रात कोणतीही व्यक्ती रेती/वाळू उत्खनन/वाहतुक करणार नाही किंवा उत्खनन/ वाहतुकीकरीता वापरण्यात येणारी साधने व याव्यतिरिक्त इतर संशयास्पद साधने घेऊन दिनांक १६ मार्च, २०२० पासुन ते पुढील आदेशापर्यंतच्या कालावधीत उपरोक्त क्षेत्रात वावरणार नाहीत करीता खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ अन्वये मला मिळालेल्या अधिकाराचा वापर करुन उक्त क्षेत्राचे १०० मिटर परिघीय क्षेत्रात खालीलप्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश जारी करीत आहे.

१. पावळे, टिकास, सब्बल, टोपले, बैल बंडी, ट्रॅक्टर, ट्रॅक्टर ट्रॉली वा इतर वाहन किंवा इतर कोणतीही रेती/वाळू उत्खनन/वाहुक करणारे वस्तु सदर क्षेत्रात आणने व नेण्यास मनाई राहील.

२. ज्यामुळे सार्वजनिक रस्त्याचे नुकसान होईल, पर्यावरणाचा नुकसा होईल, शासनाचा महसुलाचा नुकसान होईल, मानवि नुकसान होईल असे कोणतेही कृत्यास सदर क्षेत्रात मनाई राहील.

३. रेती घाटांवर कोणत्याही प्रकारची अवजार/वाहन वा ज्यामुळे रेतीचे उत्खानन व वाहतुक करता येईल अशी साधने ने-आण करता येणार नाही.

४. कोणत्याही प्रकारची अवैधरीत्या वाहतुक करता येणार नाही.

५. उपरोक्त नदीपरीसरातील शेतकरी गुरांना पाणी पाजणे शेतीसंबंधी खऱ्याखुऱ्या कामाकरीता लागु होणार नाही.

सदर आदेश या उपविभागातिल सर्व रेतीघाट व घाटाचे १०० मीटर परिघीय क्षेत्राकरीता लागु राहतील तसेच संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांचे बाबतीत आपले कर्तव्ये पार पाडण्याचे अनुषंगाने लागू राहणार नाहीत.

सदर आदेशाच्या प्रती तहसिलदार, गडचिरोली/धानोरा, या उपविभागातिल नगरपरीषद, नगरपंचायत, सर्व तलाठी कार्यालय, सर्व ग्रामपंचायत कार्यालय इत्यादींचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर लावून तसेच सहज दिसण्याजोग्या जागी लावून व मुनादीद्वारे प्रसिध्द करावे.

हे आदेश आज दिनांक १६.०३.२०२० रोजी माझे सही व शिक्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

उपविभागीय दंडाधिकारी दंडाधिकारी सत्यमेव जयते

उपविभागीय दंडाधिकारी,
गडचिरोली

प्रतिलिपी :-

१) मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली यांना माहितीस सविनय सादर.

२) मा. पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांना माहितीस सविनय सादर.

३) उपविभागीय पोलीस अधिकारी, ......................(सर्व) यांना माहितीस तथा उचित कार्यवाहीस समादराने अग्रेषीत.

४) जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली यांना सदर आदेश शासकीय संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.

५) तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, गडचिरोली/धानोरा यांना माहितीस तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रषीत.

६) पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन ............................ (सर्व) यांना माहितीस तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषीत.

७) सरपंच/सचिव, ग्राम पंचायत .................. (सर्व)यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.

८) मंडळ अधिकारी, ............................ (सर्व)ली यांना आवश्यक कार्यवाहीस अग्रेषीत.

९) तलाठी ............................ (सर्व) आवश्यक कार्यवाहीस अग्रेषीत.

उपविभागीय दंडाधिकारी,
गडचिरोली